# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# ज्ञानाचा आयुष्यात उपयोग करता आला पाहिजे

## संजीव चव्हाण यांचे प्रतिपादन, पाटणमध्ये सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळा उत्साहात

वार्ताहर
पाटण

नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे आहे. नवीन अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात सखोल भर पडू शकते. पारंपारिक शिक्षण पद्धतीपेक्षा नवीन शैक्षणिक धोरणातील अभ्यासक्रम हे व्यापक आहेत. त्यामुळे विद्यार्थी अधिक सक्षम होण्यास मदत होईल. अभ्यासक्रमात आपण जे शिकतो, त्या ज्ञानाचा आपल्याला आयुष्यात उपयोग करता आला पाहिजे, असे प्रतिपादन येथील कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी केले.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या येथील बी. डी. कॉलेजमध्ये सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी



**पाटण : येथील बी. डी. कॉलेजमध्ये सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना संचालक संजीव चव्हाण.**

ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार होते. यावेळी प्रा. डॉ. डी. आर. फडतरे, डॉ. प्रा. एस. एस. तडाखे, प्रा. डॉ. सौ. एच. व्ही. काटे तसेच विषयतज्ज्ञ डॉ. के. डी. कुच्चे, प्रो. डॉ. एम. टी. गोफणे, प्रो. डॉ. एम. ए. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी भूगोलशास्त्र विभागाची बी.ए. भाग दोन व गणितशास्त्र विभागाची बी. एसी. भाग दोन या वर्गासाठी एनईपी २.० साठी कार्यशाळा घेण्यात आली.

प्राचार्य डॉ. एस. डी. पवार म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणात जे बदल झाले आहेत, ते स्वीकारावे लागतील. प्रत्येक विषयाचे वेगळे महत्त्व असून त्याचा अभ्यास सर्वांगाने होणे आवश्यक आहे.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. द्वितीय सत्रामध्ये विषयतज्ज्ञ प्रो. डॉ. व्ही.आर. वीर, प्रा. डॉ. पी. आर. जाधव, प्रो. डॉ. आर. एस. शिकलगार यांनी भूगोल शास्त्रातील पर्यावरणशास्त्र आणि नकाशाशास्त्रातील प्रात्यक्षिक विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेस विविध महाविद्यालयातील सुमारे १७५ प्राध्यापक उपस्थित होते. प्रा. डॉ. डी. आर. फडतरे यांनी प्रास्ताविक, प्रा. डॉ. संदीप तडाखे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. एस. एस. पवार यांनी केले. कार्यशाळेसाठी प्रा. डॉ. संतोष पाटील, प्रा. गंगाराम चव्हाण यांचे सहकार्य लाभले.